(**In Camera**) **निशाणी क्र.३४**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार यांचा उलटतपास जाबदेणार क्र.१ ते ५ तर्फे वकील श्री. ए.एस.धारुरकर यांच्यामार्फत शपथेवर सुरु–</u>**

८. मी अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांच्या लग्नाचा खर्च केला, संसारोपयोगी साहित्य दिले असे दाखविणाऱ्या पावत्या दाखल केल्या नाहीत. माझ्या मुलीने तिला सासरी त्रास होत होता हे सांगितल्यानंतर मी पोलिस ठाणेत तक्रार दाखल केलेली नाही. माझ्या मुलीला कोणत्या तारखेला काय त्रास झाला ते मला सांगता येणार नाही. हे खरे की, माझ्या सरतपासात माझ्या मुलीला झालेल्या त्रासाच्या ज्या घटना नमुद आहेत त्या मी स्वतः पाहिलेल्या नाहीत. माझ्या मुलीला गोळ्या देऊन मारण्याचा प्रयत्न केला असे माझ्या सरतपासात नमुद आहे त्याबाबत मी पोलिस ठाणेत तक्रार केलेली नाही.

९. माझे नेहमी पोलिस ठाणेत जाणे–येणे असते. हे खरे नाही की, पोलिस ठाण्यात माझ्या ओळखीचे साहेब आहेत. माझ्या मुलीने पोलिस ठाणेत दिलेल्या तक्रारीच्या प्रती या केसकामी दाखल केलेल्या आहेत. मी भिगवण व बारामती पोलिस ठाणेत तक्रार दिली. मी भिगवण व बारामती येथे तक्रार दिली कारण माझ्या मुलीच्या अंगावर चट्टे पडले होते. माझ्या मुलीला किती तारखेला हाकलून दिले याची तारीख मला सांगता येणार नाही. माझ्या मुलीला सासरी त्रास द्यायचे म्हणून ती माहेरी आली. त्याचप्रमाणे तिला मुल होत नाही, ती शिकलेली नाही असा त्रास व्हायचा. तिला सासरी होणारा त्रास सोडून वेगळ्या कारणासाठी ती माहेरी आलेली नाही.

१०. माझ्या मुलीची नांदायला जायची इच्छा होती. त्यावेळी आम्ही पाहुण्यांना घेऊन बारामती येथे बैठका घेतल्या. त्याच्या तारखा मला सांगता येणार नाहीत. आम्ही नांदायला नेण्याकरिता नोटीस पाठवलेली नाही. हे खरे नाही की, माझ्या मुलीला सासरी होणाऱ्या त्रासाबाबत नमुद केलेल्या सरतपासातील घटना खोट्या आहेत. हे खरे नाही की, मला माझी मुलगी सासरी जायला नको आहे. माझे जावई कुरकुंभ येथील कंपनीत कामाला आहेत त्या कंपनीचे नाव मला सांगता येणार नाही. मी माझ्या जावयाचे पगारपत्रक दिलेले नाही. जाबदेणार क्र.२ ते ४ व ५ यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा मी दिलेला नाही. हे खरे नाही की, जाबदेणार यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन

नाही. हे खरे नाही की, विवाहाचा संपूर्ण खर्च जाबदेणार यांनी केला. जाबदेणार यांनी अर्जदारास काहीही दागिने दिले नाहीत. हे खरे की, विवाहाच्या वेळी कोरोना कालावधी असल्याने लग्नाकरिता जास्त लोक आले नव्हते. अंदाजे लग्नाला २०० माणसे होती. मी लग्नाच्या वेळी दिलेले पैसे घरातील होते. मी अंदाजे ३.५ ते ४ लाख रुपये खर्च केला. ते उत्पन्न मला शेतीतून मिळाले होते. हे खरे की, माझी मुलगी नांदायला गेल्यावर सुरुवातीचे १५–२० दिवस तिला व्यवस्थित नांदविले. हे खरे नाही की, त्यावेळी माझी मुलगी मला व माझ्या पत्नीला फोन करायची. हे खरे नाही की, माझी मुलगी सासरच्या लोकांबरोबर भांडण करायची. हे खरे नाही की, तरीदेखील जाबदेणार माझ्या मुलीला व्यवस्थित सांभाळायचे.

**११.** हे खरे की, माझ्या मुलीची सासू मणक्याच्या आजाराने त्रस्त असुन ती बेड रिडन आहे. हे खरे नाही की, कोरोना कालावधीत आमच्या घरात कोरोना पेशंट होते. माझी मुलगी सासरच्या लोकांबरोबर सहलीला गेली होती अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, ऑक्टोबर २०२२ मध्ये माझ्या मुलीने जावयाशी स्वतंत्र राहण्याच्या कारणावरुन भांडण केले व मी सासरी जाऊन मुलीला घेऊन आलो. दि.११/०५/२०२३ रोजी जाबदेणार हे माझ्याविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार द्यायला गेले अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, आम्ही त्यांना मारहाण केली होती. हे खरे नाही की, मी व माझ्या मुलीने ही खोटी केस दाखल केली आहे. हे खरे नाही की, माझी आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे खरे की, माझ्या जावयावर त्याच्या आई–वडिलांची जबाबदारी आहे. हे खरे नाही की, माझ्या जावयावर घराची संपूर्ण जबाबदारी आहे.

**१२.** माझ्या नावावर एक एकर शेती आहे. मी त्याचा उतारा दाखल करायला तयार आहे. माझा दुधाचा व्यवसाय नाही. हे खरे नाही की, माझे जावई खाजगी ठिकाणी कामाला जातात. माझ्या मुलीची नांदायला जाण्याची मागणी आहे. हे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर मी वाचलेला नाही. हे खरे नाही की, तो संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, माझ्या मुलीच्या सांगण्यावरुन मी साक्ष देतो. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

इतर किरकोळ फौ.अ.क्र.१९/२०२३

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.12.20 16:36:56 +0530

(प्राजक्ता राजीव सबनीस)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे.

दि.२०/१२/२०२५